# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १४८-२२** **दिनांक :- २६/०५/२०२२**

## हिलटॉप लॉजवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक २५.०५.२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष भाईंदर यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, हिल टॉप लॉजींग आणि बोर्डीग, वरसावे गाव, घोडबंदर रोड, काशिमीरा येथे लॉजिंगचा मॅनेजर, वेटर व वॉचमन पुरणसिंग हे हिल टॉप लॉजमध्ये येणाऱ्या पुरुष गिऱ्हाईकाकडून वेश्यागमनाच्या मोबदल्यात मुली पुरवितात.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. एस. एस. पाटील यांनी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना हिल टॉप लॉजींग आणि बोर्डीग या ठिकाणी पाठवुन मिळालेल्या बातमीची सत्यता पडताळुन पोलीस पथकासह दिनांक २५/५/२०२२ रोजी १९.०५ वा. छापा टाकला असता सदर छापा कारवाईमध्ये हिल टॉप लॉजचे वॉचमन पुरण सिंग याने वेश्यागमनाच्या मोबदल्यात बोगस गिऱ्हाईकास वेश्यागमनाकरीता मुलगी पुरविल्याचे निष्पन्न झाल्याने पिडित मुलीची सुटका करुन हिल टॉप लॉजिंग आणि बोर्डिंगचे मॅनेजर १) रमेश भिवा वाडु, वय-४५ वर्ष, २) पिंटु सुदाम ठाकुर, वय-३८ वर्ष, ३) पुरण पदम सिंग, वय-४३ वर्ष व पाहिजे आरोपी हॉटेलचे चालक/मालक यांचे विरुध्द सहापोउपनि उमेश हरी पाटील यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन काशिमिरा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ३४६/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३७०, ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३, ४, ५, ७ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि.श्री. संपतराव पाटील, सहापोउपनि/उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र एस. पाटील, पोशि/ केशव शिंदे, मपोहवा/सुप्रिया तिवले व चा.पोहवा/सम्राट गावडे अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.